उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना महायुतीमध्ये सहभागी होण्याचं आमंत्रण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नंदुरबारमधल्या सभेत दिलं. प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होऊ शकतात यासंदर्भातलं वक्तव्य शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी केलं होतं. त्यासंदर्भातून प्रधानमंत्री मोदी बोलत होते.

**होल्ड प्रधानमंत्री २**

वंचित वर्गाच्या आरक्षणाच्या रक्षणासाठी सदैव कार्यरत राहून ST, SC आणि ओबीसींचं आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देऊ देणार नाही याचा पुनरुच्चार मोदी यांनी आज केला. महाविकास आघाडी आरक्षण SC, ST आणि OBC चे हटवण्यासाठी कार्यरत आहे. आरक्षण वाचवण्याचं आश्वासन आपण गेले कित्येक दिवस देत असून काँग्रेस या मुद्द्यावर काहीही बोलायला तयार नसल्याचा दावा त्यांनी केला.

आदिवासींच्या विरोधामुळं काँग्रेसनं राष्ट्रपतीपदासाठी द्रौपदी मुर्मू यांना विरोध केल्याचं ते म्हणाले. राम मंदिराच्या मुद्द्यांवरुन काँग्रेसनं घेतलेल्या भूमिकेवर त्यांनी टीका केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी प्रधानमंत्र्यांच्या संदर्भात वापरलेल्या आक्षेपार्ह शब्दांचा त्यांनी समाचार घेतला. देशातल्या सर्व माता-भगिनी माझ्या संरक्षक असल्याचं त्यांनी सांगितलं. सीकल सेल ॲनिमिया निर्मुलनसह नंदुरबारमधल्या विकासकामांचा दाखला त्यांनी यावेळी दिला.

**<><><><><>**

शरद पवार यांनी मात्र मोदी यांचा प्रस्ताव फेटाळला आहे. नरेंद्र मोदी यांची अलिकडची सगळी भाषणं समाजात गैरविश्वास निर्माण व्हायला पोषक आणि देशाच्या दृष्टीने घातक आहेत. जे देशाच्या हिताचे नाहीत ते आमचे सहकारी असणार नाहीत, असं शरद पवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले. गांधी-नेहरुंच्या विचारधारेवर आमचा

पक्ष चालतो. समाजातल्या सर्व घटकांना एकत्र ठेवून आम्ही काम करतो, त्यामुळं अशा प्रस्तावाला पाठिंबा देता येणार नाही, असं ते म्हणाले.

**<><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदानानंतर भारतीय जनता पक्ष १५०, जागाही जिंकू शकत नाही हे स्पष्ट झाले आहे. पराभवाच्या चिंतेतून नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांना एनडीएमध्ये सहभागी होण्याची जाहीर ऑफर दिली आहे, असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. भाजपाने लोकसभा निवडणुकीत सर्व प्रकारची कार्ड वापरली पण कोणतेच कार्ड चालले नाही, हिंदु-मुस्लीम कार्डही फेल गेलं, त्यामुळे नरेंद्र मोदी यांना दररोज नवे कार्ड वापरावे लागत आहे, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><>**

आमचं सरकार आल्यावर कांदा, आरक्षण आणि राजकीय कारणासाठी दाखल असलेले गुन्हे मागे घेणार असल्याचं आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिले. अहमदनगर  लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार निलेश लंके यांच्या भातकुडगाव फाटा येथे आयोजित प्रचार सभेत त्या बोलत होत्या. राज्यातले भाजपा खासदारांनी कांदा, दुध आणि आरक्षणाच्या मुद्द्यावर लोकसभेत कितीवेळा बोलले असल्याचं म्हणतं त्यांनी भाजपा खासदारांवर टीका केली.

**<><><><>**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाकडून कथित मद्यधोरण प्रकरणात १ जून पर्यंत अंतरिम जामीन मंजूर झाला आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांच्या खंजपीठानं आज हा निर्णय दिला.

लोकसभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयानं मुभा दिली असून २ जून रोजी त्यांना आत्मसमर्पण करावं लागेल. ईडीने काल सर्वोच्च न्यायालयासमोर प्रतिज्ञापत्र दाखल करून केजरीवाल यांना अंतरिम जामीन देण्यासाठी विरोध केला होता. केजरीवाल यांना २१ मार्च रोजी ईडीनं अटक केली होती. तेव्हांपासून ते तिहार तुरुंगात आहेत.

**<><><><><>**